# दत्ताची भूपाळी १

उठि उठि दत्तात्रया, करुणासिंधु कृपालया ।
उठवी माता अनसूया, प्रेमें टाळ्या पिटूनिया ॥धृ॥
सप्तपंचम अरुणोदय । जाला स्नानाचा समय ।
भानुप्रकाश होऊं पाहे । रविरश्मि दाटल्या ॥१॥
उठले साधकांचे वृंद । करिति तवनामाचा छंद ।
हृदयीं ध्याती ब्रह्मानंद । प्रेमभावें करूनी ॥२॥
व्यास वाल्मीक नारदमुनि । आदि करोनि सर्व मुनी ।
उभे राहिले आंगणीं । दर्शनासी पातले ॥३॥
गंगायमुना सरस्वती । तुंगभद्रा भागीरथी ।
मनिकर्णिका भीमरथी । स्नान घालूं पातल्या ॥४॥
इंद्रचंद्रादि सुरगण । आले दर्शनालागून ।

करिती स्तोत्र अनुवादन । कीर्ति तुझिया नामाची ॥५॥

ऐकुनि मातेची करुणा । उठला साधकांचा राणा ।

निरंजनाचीये मना । प्रेमानंद दाटला ॥६॥

*********************

भूपाळी दिगंबराची २

उठि उठि दिगंबरा । स्वामि सद्‌गुरु दातारा ।

सर्व त्रैलोक्यउद्धरा । करुणाकरा उठि वेगीं ॥धृ॥

पंचपंच उष:काळ । सप्तपंच अरुणाचळ ॥

करितां षट्कर्में सोज्वळ । होती वेळ सर्वेशा ॥१॥

भागीरथींसी जाऊन । सारूनिया संध्यास्नान ॥

पंढरपुरासीं चंदन । लावावया जाणें कीं ॥२॥

कृष्णातीरासी जाऊन । कर्म माध्यान्हीं करून ॥

करवीर क्षेत्रामाजी जाण । भिक्षाटन मागणें ॥३॥

पंचालेश्वर सिद्धस्थान । तेथें सारुनी भोजन ।

सर्वेंचि सांभवी प्राशन । तुळजापुरीं करणें कीं ॥४॥

सेखाचळावरि आसन । करोनि माहूरासी जाण ।

तेथें करोनि शयन । जन्मस्थान पाहे पां ॥५॥

पश्चिमे गिरनार जाण । तेथें सारोनि आसन ।

मुद्रा खेचरि लावून । सोहंध्यान साधी कां ॥६॥

सर्व त्रैलोक्या माझारी । प्राणी कोणी स्मरण करी ।

तत्क्षणीं तेथवरी । जाणें लागे सर्वेशा ॥७॥

ऐकुनि भक्ताची करुणा । उठिला साधकांचा राणा ।

निरंजनाचिया मना । प्रेमानंद दाटला ॥८॥

*******************

भूपाळी श्रीदत्तप्रभूची  ३

दत्तदिगंबरा, ऊठ करुणाकरा । पहाट झाली पुरे झोंप आतां ।

भक्तजन हे उभे वाट पाहती सभे । दर्शनें देई त्यां शीघ्र शांता ॥ध्रु०॥

अरुण तम दूर करी कुंकुमें नभ भरी । बापडी ही उषा पदर पसरी ।

गंग खळखळ करीं त्वद्यशें जगभरी । मंद वाहे कशी अनिललहरी ॥दत्त०१॥

वनगंधर्व हे सुस्वरें गाइती । मोर केकारवें नृत्य करिती ।

मुनिकुलें गर्जती वेदमंथगिरा । ऊठ बा श्रीधरा राधु पठती ॥दत्त०२॥

षट्पदें पद्मदलीं गुंजती प्रियकरा । भेटती ही मुद्रा चक्रपिल्ली ।

रंग कष्टी उभा पाहूं दे मुखप्रभा । लोळूं दे सतत बा चरणकमळीं ॥दत्त०३॥

************************

भूपाळी श्रीदत्तप्रभूची ४

पहाटेसी उठोनि भक्त हर्षुनियां चित्तीं ।

दत्तगुरुप्रति भेटूं येती सह्याद्रीवरती ॥ध्रु०॥

कृतवीर्यात्मज सहस्त्रबाहू अर्जुन तो पुढती ।

कयाधुसुत जो भागवतोत्तम प्रहलाद सुमती ॥१॥

ययातिसुत यदु ज्याच्या वंशा देवही वंदीती ।

मदालसेचा नंदन चौथा अलक जया म्हणती ॥२॥

सुरतपानामक भूसुर मुनिवर विष्णुदास सुमती ।

अन्यहि येती सुरमौनितती करिती ते प्रणती ॥३॥

अनसूयेच्या बाळा दत्ता करितो तुज विनती ।

उठी उठी विमला, अरुण उदेला सरली हे राती ॥४॥

मंगलधामा मेघश्यामा, उठी उठी तुं निगुती ।

अरुण उदेला, प्रकाश पडला पक्षी गलबलती

॥५॥

कुंकुंम माखुनि प्राचीकामिनी हर्षुनि आत्मपती ।

येतो म्हणुनि ये लगबगुनी लाटीनम पुढती ॥६॥

द्विजाती उठती वेदा पुढती वासुदेव प्रार्थी ।

उठी उठी दत्ता श्रीगुरुनाथा दावी सुखदीप्ती ॥७॥

*********************

भूपाळी श्रीदत्तात्रेयाची ५

उठिं उठिं बा दत्तात्रेया । भानु करुं पाहे उदया ।

करणें दीनांवरती दया । चरण दावें वेगेंसी ॥ध्रु०॥

मंद वायूही सूटला । पक्षी करिताती किल्बिला ।

दीपवर्ण शुभ्र जाला । पूर्व दिशा उजळली ॥१॥

करुनि कृष्णेचें सुस्नान । घेऊनि पूजेचें सामान ।

सकळां लागलें तव ध्यान । कपाट केव्हां उघडेल

॥२॥

आले देवादिक दर्शना । त्यांच्या पुरवाव्या कामना
।

संतोषोनि आपल्या मना । तीर्थप्रसाद अर्पावा
॥३॥

गुरु त्रैमूर्ति साचार । करिसी पतितांचा उद्धार ।

म्हणुनि धरिसी हा अवतार । संकटीं भक्तां रक्षिसी
॥४॥

रामदास लागे पायीं । मागे इच्छा हेंचि देई ।

तूंचि माझी बाप मायी । प्रतिपाळावें भक्तांसी
॥५॥

********************

भूपाळी श्रीदत्तप्रभूची ६

उठी उठी बा मुनिनंदना । भक्त पातले दर्शना ।

त्यांची पुरवी तूं कामना । पाही नयन उघडूनी
॥ध्रु०॥

उघडुनियां करुणादृष्टी । दासां धरी आपुलें पोटीं ।
नको येऊं देऊं हिंपुटी । घाली कंठीं मिठी हर्षे ॥१॥

हर्षे तुझे पदीं रंगले । दारागारा विसरले ।
निजदेहा न भुलले । विनटले निजभावें ॥२॥

निजभावें येतां शरण । लपविसी कां बा चरण ?
जेणें तरती दुष्टाचरण । मग मरणभय कैचें ? ॥३॥

नको करुं निष्ठुर मन । शीघ्र देई आश्वासन ।
तूं असती करुणाघन । तापशमन करि शीघ्र ॥४॥

उठीं उठीं बा सद्गुरुराया । उठी उठी करुणालया ।
उठी उठी वा चिन्मया । निजमाया आवरीं ॥५॥

**********************

भूपाळी श्रीदत्तप्रभूची ७

उठीं उठी श्रीदत्तात्रेया । श्रीपादश्रीवल्लभा सदया ।

श्रीनृसिंहसरस्वती गुरुवर्या । दर्शन देई भक्तांसी ॥ध्रु०॥

पंच पंच उषःकाल जाहला । अरुणोदय सप्तपंच धाटिला ।

अष्टपंच प्रातःकाला । उदया पावे रवि पूर्ण ॥१॥

आले अमरेंद्रादि अमर । संत साधु मुनिवर ।

समग्र आले नारीनर । कांकड आरती पहावया ॥२॥

नमितां पूर्ण मनोरथ होती । त्रिविध ताप समूळ हरती ।

पूर्वज समस्त उद्धरती । कांकड आरती देखिलिया ॥३॥

वेगें उठती सद्‌गुरुमूर्ती । सकळिक पदांबुज वंदिती ।

स्तवनीं ध्यानी ओवाळिती । विश्वव्यापक परमात्मा ॥४॥

गुरुत्रैमूर्ति आश्रम घेऊन । तरुवरीं ब्रीदरक्षणार्थ राहुन ।

स्मरतां तारिसी जन संपूर्ण । रक्षिसी गुरुभक्त सर्वदा ॥५॥

************************

भूपाळी श्रीदत्तप्रभूची ८

उठीं उठीं बा आत्मया । चिन्मया दत्तात्रेया ।

सोडुनिया गुणमय शय्या । जागृत हो अपसैय्या ॥ध्रु०॥

झाली बा प्रबोध पहांट विवेक हा अरुण ।

आला उजळित आशा आतां उगवे चित्किरण ॥१॥

फिक्कट पडला व्यवहारेंदु वैरि निशाचर ।

कामादि हे लपले पाहुनि प्रकाश हा थोर ॥२॥
दुस्तर्कादिक दिवाभीत दडले ते ह्या वेळीं ।
दुर्वृत्ती ह्या तारा गगनीं मावळल्या सकाळीं ॥३॥
शमादि विप्र पुढें सादर राहति सांडुनिया दर ।
उठी उठी बा तूं निजरुपा दावीं ह्या सादर ॥४॥
रागद्वेष मलोत्सर्गा करुनि आला पुढती ।
वासुदेवा भेट दे हा करिताहे प्रणती ॥५॥
*********************

भूपाळी श्रीदत्तप्रभूची ९

उठी सत्त्वर प्रभुवरा यतिवरा । स्नानासी उशीर जाहला ।

देवा स्नानासी उशीर जाहला । पाहें स्वामि दयाळा ।

त्रिभुवन पाळा । अरुणोदय जाहला ॥ध्रु०॥

कर जोडुनी सुरनर मुनिवर उभे महाद्वारीं । देवा उभे महाद्वारीं ।

द्यावें दर्शन श्रीहरि नरहरी । सद्‌गुरु अवधारीं ॥१॥

सद्‌गुरु मूर्ती अनंत कीर्ति श्रुति वर्णिती पाहीं ।

देवा श्रुति वर्णिती पाहीं ।

स्मरणीं तारक निज सुखदायक । भक्तां लवलाहीं ॥२॥

ऐकुनी वाणी चिन्मय खाणीं । उठतां विश्वात्मक तारुं ।

सद्‌गुरु विश्वातमक तारुं ।

सर्वही ध्यानीं वंदन करिती । गुरुवर कल्पतरु ॥३॥

काषायांवर भस्मभूषणें धारण रुद्राक्षाभरणें ।

विलसती रुद्राक्षाभरणें ।

दंडकमंडलु, गदा, पद्म, । शंख, चक्र, शोभती पूर्णें ॥४॥

किरीटकुंडलमंडित षड्भुजमूर्ती कीर्ति सांवळी ।

प्रभूची मूर्ती कांति सांवळी ।

नमितां श्रीगुरु भक्त दत्त सतत पदी । नांदवि तात्काळीं ॥५॥

**********************

भूपाळी श्रीदत्तप्रभूची १०

पाहें पाहें सद्गुरुमूर्ती । त्रिगुणात्मका त्रैमूर्ती ।

परमात्मया त्रैमूर्ती ।

विश्वजीवना अनादिमूर्ती । कृपादृष्टीनें पहावें ॥ध्रु०॥

श्रीगणपति शिव विश्वेश्वर । चिदंबरेश्वर परमेश्वर ।

चिदंबरेश्वर परमेश्वर ।

श्रीअविमुक्तेश्वर कोटेश्वर । संगमेश्वर योगिनी निष्ठती ॥पाहें॥१॥

श्रीअमरेश्वर शक्तीश्वर । प्रयागेश्वर वरदेश्वर

।प्रया०।

श्रीसिद्धेश्वर कामेश्वर । शिवपंचायतन विराजे ॥पाहें॥२॥

श्रीपापविमोचनेश्वर । शुक्लेश्वर नंदिकेश्वर ।शुक्ले०।

द्विशक्ती पन्नग मारुती । चक्र आदिमाया श्रीजाह्नवी ॥पाहें॥३॥

महाकाळेश्वर सर्वेश्वर । अन्नपूर्णा सुरतरुवर ।अन्नपू०।

श्रीरामचंद्र योगेश्वर । रामेश्वर श्रीकमला ॥पाहें॥४॥

श्रीनारायणस्वामी यतीश्वर । गोपाळस्वामी अखिलेश्वर ।गोपा०।

कृष्णानंद यतिपति खगेश्वर । लक्ष्मीनारायण सहित ॥पाहें॥५॥

श्रीविठ्ठराई रुक्मिणी । हरिहरब्रह्मेश्वर सगुणी ।हरिहर०।

वसे मृत्युंजय सुरादि शशीतरणी । भूत्रिभूवनीं अनुपम्य ॥पाहें॥६॥

श्रीब्रह्मदेव माधवेश्वर । विश्वंभरेश्वर सर्वभूतेश्वर ।विश्वं०।

श्रीउमामहेश्वर स्वामीकार्तिकेश्वर । काळभैरव क्षेत्रपाळ ॥पाहें॥७॥

श्रीकृष्णानदी संगमीं । कामधेनु सिद्धवरदभूमि ।काम०।

वसतीस्वामी कल्पद्रुमीं । प्रबलाश्रय तो अखिलांचा ॥पाहे॥८॥

सुरेंद्रादि निर्जर प्रीती । ऋषि योगी मुनिजन तप तपती ।ऋषि०।

श्रीप्रभु देती चतुर्विध मुक्ती । आरती करितां गुरुभक्त ॥पाहें॥९॥

*******************

भूपाळी श्रीदत्तप्रभूची  ११

उठीउठी बा श्रीगुरुवरा । श्रीशेषशायी श्रीधरा ।

श्री विधि हरिहरा सुरवरा । श्रीदत्तात्रेयमूर्ती यतिवरा ॥ध्रु०॥

आले संत सनकादिक । सनकनंदन श्रीशुक ।

सनत्कुमार पुंडरिक । सनत्सुजात सनातन आले शौनक ॥उठी०॥१॥

अलर्क यदुवर प्रह्लाद । श्रीव्यास सप्तऋषि नारद ।

रैवतकाची मैत्री रुक्मांगद । आले जयविजय कुमुदनंद सुनंद हो ॥उठी०॥२॥

आले अंबऋषी प्रह्लादन । श्रीभीष्मदा लभ्य सुबिभीपण ।

पराशर योगी मुनी सिद्ध पूर्ण । आले चतुर्दिशेचे भक्त संपूर्ण हो ॥उठी०॥३॥

गंधर्व अप्सरा किन्नर करितां नृत्य सुस्वरें तुंबर ।

उठवुनि प्रार्थी गुरुभक्त प्रभुवर । प्रेमालिंगन देई सर्वां अभयवर हो ॥उठी०॥४॥

**********************

भूपाळी श्रीदत्तप्रभूची  १२

उठि उठि दत्तात्रेया । करुणासिंधु कृपालया ।

उठवि माता अनसूया । प्रेमें टाळ्या पिटूनियां ॥ध्रु०॥

सप्तपंचम अरुणोदय । जाला स्नानाचा समय ।

भानुप्रकाश होऊं पाहे । रविरश्मि दाटल्या ॥१॥

उठले साधकांचे वृन्द । करिति तव नामाचा छंद ।

हृदयीं ध्याती ब्रह्मानंद । प्रेमभावें करुनी ॥२॥

व्यास वाल्मिकि नारदमुनि । आदि करोनि सर्व मुनी ।

उभे राहिले आंगणीं । दर्शनासीं पातले ॥३॥

गंगा यमुना सरस्वती । तुंगभद्रा भागीरथी ।

मणिकर्णिका भीमरथी । स्नान घालूं पातल्या ॥४॥

इंद्रचंद्रादि सुरगण । आले दर्शनालागून।

करिती स्तोत्र अनुवादन । कीर्ति तुझिया नामाची ॥५॥

ऐकुनि मातेची करुणा । उठला साधकांचा राणा ।

निरंजनाचिये मना । प्रेमानंद दाटला ॥६॥

**********************

भूपाळी श्रीदत्तप्रभूची  १३

ऐका भोळे भाविकजन । नित्य करा गुरुचिंतन ।

महादोष होती दहन । स्मरणमात्रें करुनिया ॥ध्रु०॥

गुरुसेवा घडेल ज्यासी । काळ दंडीना तयासी ।

अंतीं जाय मोक्षपदासी । गुरुस्मरण केलिया ॥१॥

गुरु भक्तीचा दाता । गुरु देहासी चालविता ।

हरे पातकाची व्यथा । गुरुस्मरण केलिया ॥२॥

गुरु ज्ञानाचा सागरु । गुरु धैर्याचा आगरु ।

गुरु नेईल पैल पारु । नामस्मरण केलिया ॥३॥

गुरु मायेचें निरसन । गुरु मायेचें अंजन ।

गुरुचें अगाध महिमान । मुखें कित्येक वदावें ॥४॥

गुरु संतांचें निजगुज । गुरु मंत्रांचें निजबीज ।

गुरुचें घ्यावें चरणांबुज । अनेक तीर्थें त्या ठायीं ॥५॥

जयजय गुरु मायबापा । चुकवी चौर्यांशीच्या खेपा ।

भक्तराज ध्यातो गुरुबापा । ब्रह्मीं लय लावुनिया ॥६॥

*******************

संग्रह :- अशोककाका कुलकर्णी

९०९६३४२४५१